लोकमत

# विद्यार्थ्यांचा सायबर सुरक्षेचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**भंडारा :** गणेशपूरच्या राजासमोर जे. एम. पटेल कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सायबर सुरक्षेचा अनोखा जागर करण्यात आला. सन्मित्र गणेश मंडळाच्या गणेशपूरच्या राजासमोर सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. सायबर गुन्हेगारीची समस्या ही आता वैश्विक समस्या बनलेली आहे. यावर आळा घालायचा असेल तर तो फक्त सायबर शिक्षेद्वारेच सर्वांना जागृत करूनच शक्य आहे. म्हणून जे. एम. पटेलच्या ३० सायबर योद्ध्यांनी जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जाऊन ४० हजारांपेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांना सायबर शिक्षित केले. हे सर्व कार्य जे. एम. पटेल महाविद्यालयाने क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या सोबत केलेल्या सामंजस्य कराराअंतर्गत करण्यात आले.

शुक्रवारी सायंकाळी ५ ते ९ या वेळात जे. एम. पटेल महाविद्यालयातील संगणक विभागांतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे, एनएसएस सेल, एनसीसी



गणेशपुरचा राजा येथे जागर उपक्रमात सहभागी झालेले कॉलेजचे विद्यार्थी.

युनिट तसेच क्विक हिल फाउंडेशन आणि सायबर पोलिस भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशपूरचा राजा येथे ३० सायबर योद्ध्यांनी विविध कार्यक्रमांच्या द्वारे सायबर सुरक्षेसाठी जनजागृती केली. लेझीम सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर नृत्याविष्काराच्या द्वारे या विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया आपल्याला कशाप्रकारे बंदिस्त करतो आणि त्यापासून आपण स्वत:चे सरंक्षण कसे करू शकतो हे सर्व नागरिकांना पटवून दिले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास ढोमणे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. कार्तिक पनीकर, डॉ. प्रवीण घोसेकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सायबर सेलचे शिंदे, हेडकॉन्स्टेबल दिनेंद्र आंबेडारे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी गणेशपूर ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय भंडाराचे समुपदेशक, सारथी कल्याणकारी संस्थेचे पदाधिकारी, सन्मित्र गणेश मंडळ, गणेशपूरचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. सबा नसीम, पलाश फेंडेवार, प्रियंका शर्मा, फरीना शेख आदींनी सहकार्य केले.

Hello Bhandara
Page No. 2 Sep 17, 2024
Powered by: erelego.com